लोकमत

शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजन : जिल्हास्तरीय महोत्सवाचा कोल्हापुरातून प्रारंभ

# युवा महोत्सव यंदा सांगलीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ३८वा मध्यवर्ती युवा महोत्सव यावर्षी ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात सांगलीतील विलिंग्डन महाविद्यालयात रंगणार आहे. जिल्हास्तरीय महोत्सवाची सुरुवात कोल्हापुरातील महावीर महाविद्यालयातून शनिवार (दि. २९) पासून होणार आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना संधी देण्यासाठी घेण्यात येणारा युवा महोत्सव जिल्हास्तरीय आणि मध्यवर्ती अशा दोन टप्प्यांमध्ये होणार आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील महोत्सव शनिवारी (दि.२९) महावीर महाविद्यालयात होईल. सातारा जिल्ह्याचा महोत्सव कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात १ ऑक्टोबर रोजी, तर सांगली जिल्ह्याचा महोत्सव आटपाडीतील बाबासाहेब देशमुख महाविद्यालयात होणार आहे.

मध्यवर्ती युवा महोत्सव सांगलीतील विलिंग्डन



महाविद्यालयात दि. ५ ते ७ ऑक्टोबरदरम्यान रंगणार आहे. एकांकिका, लोकनृत्य, लोककला वाद्यवृंद, लघुनाटिका, पथनाट्य, वक्तृत्व, प्रश्नमंजुषा, मूकनाट्य, वादविवाद या स्पर्धा जिल्हास्तरीय युवा महोत्सवात होतील. या स्पर्धांसह शास्त्रीय नृत्य, व्यंगचित्र, भित्तिचित्र, कोलाज, मातीकाम, रांगोळी, स्थळचित्रण, छायाचित्रण, शास्त्रीय गायन, सुगम गायन, पाश्चिमात्य एकल गायन, पाश्चिमात्य समूहगीत, भारतीय समूहगीत, नकला, एकपात्री, शास्त्रीय सूरवाद्य, तालवाद्य या स्पर्धा मध्यवर्ती महोत्सवामध्ये होणार आहे. पहिल्या टप्प्यात जिल्हास्तरीय महोत्सव होईल.

त्यातील विविध स्पर्धांमधील पहिल्या तीन क्रमांकांचे विजेते मध्यवर्ती महोत्सवात सहभागी होणार आहेत.

## पथनाट्य कायम

राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील महोत्सवात पथनाट्य नसल्याने विद्यापीठाच्या महोत्सवातून ते बंद करण्याचा प्रस्ताव युवा महोत्सव समितीने व्यवस्थापन परिषदेला चार महिन्यांपूर्वी सादर केला होता. मात्र, पथनाट्य बंद करू नये, अशी आग्रहाची मागणी कला-सांस्कृतिक क्षेत्रातून झाली. त्यामुळे महोत्सवात पथनाट्य कायम ठेवण्यात आले आहे.

## महोत्सवात 'मेहंदी' रंगणार

- जिल्हा पातळीवरील महोत्सवात विविध कलाप्रकारांतील १४, तर मध्यवर्तीमध्ये ३२ स्पर्धा होतात. यावर्षी 'मेहंदी' या कलाप्रकाराची स्पर्धा समाविष्ट केली असल्याचे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी सांगितले. विद्यापीठ कार्यक्षेत्रात विद्यार्थिनींची संख्या अधिक आहे.
- मेहंदी हा अनेक विद्यार्थिनींचा आवडता कलाप्रकार आहे. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी हा कलाप्रकार महोत्सवात समाविष्ट केला आहे. जिल्हास्तरीय आणि मध्यवर्ती महोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. यावर्षीचा राज्यस्तरीय 'इंद्रधनुष्य' महोत्सव डिसेंबरमध्ये नाशिक येथील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात होणार आहे. त्यासाठी विद्यापीठाची संघ निवड चाचणी दि. ८ आणि ९ ऑक्टोबरला विद्यापीठात होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 SEP 2018
तरुण भारत

# विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीत विवेकानंद कॉलेज अव्वल

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत देण्यात येणाऱ्या गुणवत्ता शिष्यवृत्तीत विवेकानंद कॉलेजने सलग २० वर्षे प्रथम क्रमांक पटकावला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी पारितोषिक स्विकारले. चालू शैक्षणिक वर्षात विद्यापीठाने ७०८ गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळवल्याचा मान विवेकानंदने मिळवला आहे. कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतून विवेकानंदने प्रथम क्रमांक पटकावला. शैक्षणिक गुणवत्तेत अव्वल असल्याचे विवेकानंदन सिध्द केल्याने शिक्षण क्षेत्रासह समाजातील सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले. सचिव प्राचार्य शुभांगी गावडे यांची प्रेरणा मिळाली. प्राचार्य, प्राध्यापक, व विद्यार्थी यांच्या अथक प्रयत्नामुळे हे सुयश प्राप्त झाले.

पुढारी

## संक्षिप्त



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ विभागीय कबड्डी स्पर्धेत राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजने इस्लामपूरच्या केबीपी कॉलेजचा ३८-२८ असा पराभव केला. विजयी संघासोबत प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे, प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, विक्रांत पाटील, शिवाजी विद्यापीठ क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते प्रा. संभाजी पाटील आदी.